शा. मु. को.-ऑर्डी. (जे) क्यूबी ३८१-१,७००-६·७१

# नमुना क्रमांक २६

## लेखा परीक्षा अहवाल-सहकारी वराहपालन (पिगरी) संस्था

### विभाग दुसरा

१) भाग भांडवल :–

(१) शासकीय भाग भांडवलासाठी भागाची प्रमाणपत्रे दिली आहेत काय ?

(२) शासकीय भाग भांडवल देताना घातलेल्या अटी आणि शर्तींची पूर्तता संस्थेने केली आहे काय ?

(३) शासकीय भाग भांडवलावरील देय लाभांशाच्या रकमेचा यथावत हिशोब केला आहे काय आणि ती दिली आहे काय ?

२) ठेवी :–

(१) सभासद आणि बिगर सभासद यांच्याकडून ठेवी उभारल्या आहेत काय ? या कारणासाठी काही नियम तयार केले आहेत काय ? त्यांचे अनुपालन होते काय ?

(२) या बाबतीतील पोटनियमातील तरतुदींचे अनुपालन होते काय ?

३) बाहेरील कर्जे :–

(१) मध्यवर्ती सहकारी बँक आणि अन्य माध्यमाकडून विविध कारणांसाठी मंजूर झालेले कर्ज आणि पतमर्यादा यांच्या काय रकमा आहेत ते लिहा.

| अनु. | माध्यमाचे नांव | कर्ज वा पत मर्यादेचा प्रकार | कारण | मंजूर रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

| उचललेली कमाल रक्कम | केलेली परतफेड | येणे बाकी | थकबाकी असल्यास | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | |

(२) कर्ज आणि पतमर्यादा यांचे व्यवहार समाधानकारक आहेत काय ? परतफेडी वक्तशीर होतात काय ?

## ४) शासकीय आणि अन्य आर्थिक सहाय :-

(१) शासन आणि अन्य माध्यमे यांच्याकडून मिळालेले आर्थिक सहाय खालीलप्रमाणे लिहा.

| अनु. | ज्या माध्यमाकडून सहाय मिळाले ते माध्यम | कारण | मंजूर रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| परतफेड केलेली रक्कम | उचललेली रक्कम | बाकी |
|---|---|---|
| ५ | ६ | ७ |
| | | |

(२) ज्या कारणासाठी आर्थिक सहाय दिले आहे त्यासाठी ते योग्यप्रकारे उपयोजिले जात आहे काय ?

(३) असे सहाय्य देतांना घातलेल्या सर्व शर्तीचे अनुपालन होते काय ?

## ५) वराह पैदास ( पिग ब्रीडींग) :-

(१) विविध प्रकारच्या वराहांसाठी संस्थेने पशुधन नोंदवही ठेवली आहे काय ?

(२) संस्थेजवळील वराह–माद्या, वराह आणि वराह–पिल्ले यांची संख्या लिहा.

(३) वर्षाच्या सुरवातीस असलेल्या, खरेदी करण्यात आलेल्या, विकलेल्या, मृत झालेल्या आणि शिल्लक असलेल्या वराह–माद्या, वराह, वराह–पिल्ले यांची माहिती मिळवा आणि लेखा परीक्षा अहवालास जोडा.

(४) (अ) सभासद वराह पालन करतात काय ?

(ब) आपले वराह ते संस्थेमार्फत विकतात काय ?

(५) (अ) संस्थेच्या वराहकुटी आहेत काय ?

(ब) शासकीय कर्जातून त्या बांधल्या आहेत काय ?

(क) असल्यास, पशुसंवर्धन खात्याने सम्मत केलेले नकाशे आणि अंदाजपत्रक यानुसार त्या बांधल्या आहेत काय ?

(६) बांधलेल्या वराहकुटयांची एकूण संख्या त्यांच्या किमतीसह लिहा आणि आगीकरिता वराहकुटयांचे विमे उतरविले आहेत काय ?

(७) वराह पालनाची व्यवस्था समाधानकारक आहे काय ?

(८) (अ) वराह पालनासाठी संस्थेच्या ताब्यात काही जमीन आहे काय ? असल्यास, जमिनींची किंमत आणि क्षेत्र लिहा.

(ब) अशा जमिनी खरेदी केल्या आहेत का भाडयाने घेतल्या आहेत ते लिहा.

(क) या कारणासाठी करून घेतलेली खरेदीखते वा भाडे-पट्टे पहा. आवश्यक तेथे त्यांची नोंदणी झाली आहे काय ?

(९) (अ) वराहांना खाऊ घालण्यासाठी जमिनीमध्ये चाऱ्याची लागवड करतात काय ?

(ब) लागवड केलेल्या चाऱ्याचे परिमाण व किंमत लिहा.

(क) चाऱ्याची शिल्लक माल नोंदवही योग्य रीतीने ठेविली असून ती अद्यावत लिहिली आहे काय ?

(१०) पैदास केंद्रावर संस्था वराह अन्न तयार करते काय ? असल्यास, संस्थेने तयार केलेल्या अन्नाचे एकूण परिमाण आणि किंमत लिहा.

(११) (अ) सभासदांना पुरविण्यात आलेल्या वराह अन्नाचे एकूण परिमाण त्याच्या किमतीसह लिहा.

(ब) ते रोखीने विकले आहे का उधारीने विकले आहे ?

(क) संस्थेच्या पोटनियमानुसार उधार विक्री अधिकृत ठरते काय ते लिहा.

(ड) अशा अन्नाच्या पुरवठयासाठी मागणी पत्रे मिळविली आहेत काय ?

(१२) वराहाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी लेखा परीक्षा काळात संस्थेने केलेल्या वैद्यकीय खर्चाची एकूण रक्कम लिहा.

(१३) (अ) औषधे सभासदांना विकतात काय ?

(ब) औषधाचे हिशेब योग्य रीतीने ठेविले आहेत काय ?

(१४) पशुरोग तज्ञाच्या निरीक्षणावर आणि मदतीवर संस्थेने कांही खर्च केला आहे काय ? असल्यास, झालेल्या खर्चांची रक्कम लिहा.

**६) वराहांची विक्री :–**

(१) (अ) वराहांच्या विक्रीच्या किंमती ठरविण्याची पद्धत लिहा.

(ब) संस्थेने केलेला एकूण खर्च विचारात घेऊन व्यवस्थापन समितीने त्या ठरविल्या आहेत काय ?

(२) संस्थेने एकाद्या वराह मांस कारखान्याला वराह पुरविले आहेत काय ? असल्यास, त्या विकलेल्या वराहांची संख्या किंमतीसह लिहा.

(३) संस्था हवाबंद मांस डबे आणि वराहापासून तयार केलेल्या अन्य वस्तु विकते काय ? असल्यास, अशा बाबींची एकूण विक्री काय आहे ?

(४) वराहापासून संस्थेने तयार केलेल्या केसांचे एकूण परिमाण लिहा. लेखा परीक्षा काळात केसांची केलेली एकूण विक्री लिहा.

(५) संस्था केस निर्यात करते काय ? असल्यास, निर्यात केलेल्या केसांचे परिमाण आणि किंमत लिहा.

(६) लेखा परीक्षा काळात काही तुटी दिसून आल्या आहेत काय? व्यवस्थापन समितीकडून या तुटी सम्मत झाल्या आहेत काय ?

**७) मांस निर्मिती संयंत्र :–**

(१) संस्थेजवळ स्वतःच्या मालकीचे मांस निर्मिती संयंत्र आहे काय ? असल्यास, लेखा परीक्षा काळात निर्माण केलेल्या मांसाचे परिमाण लिहा. मांसाची निर्मिती आणि वराहापासून अन्य तयार केलेल्या वस्तूंचे उत्पादन किफायतशीर आहे काय ? संयंत्राच्या कामकाजासंबंधी चर्चा करा.

(२) संस्थेने या संयंत्रावर गुंतविलेली एकूण रक्कम लिहा.

**८) सभासदाना कर्जे :–**

(१) (अ) वराह-पिल्ले, (ब) वराह अन्न या स्वरुपात किती रकमा सभासदांना कर्जाऊ दिल्या आहेत ते लिहा.

(२) सभासदांना दिलेल्या कर्जाबाबत त्यांच्याकडून योग्य करारपत्रे करून घेतली आहेत काय ?

(३) कर्ज देताना घातलेल्या शर्तींचे अनुपालन सभासदांनी केले आहे काय ? नसल्यास, सर्वसाधारण अभिप्रायात चर्चा करा.

(४) परतफेडी वक्तशीर आहेत काय ?

(५) ज्या दिनांकापासून रकमा थकित झाल्या आहेत ते दाखविणारी थकबाकीची यादी मिळवा आणि जोडा.

९) खर्च :–

(१) संचालक मंडळ/व्यवस्थापन समितीच्या सम्मतीसाठी खर्चाची पत्रकें ठेवतात काय ?

(२) वार्षिक अंदाजपत्रके तयार करून त्यांना संचालक मंडळ / व्यवस्थापन समिती आणि साधारण सभा यांची सम्मती मिळाली आहे काय ? विविध कारणांसाठी झालेला खर्च अंदाजपत्रकाच्या मर्यादेत आहे काय ? नसल्यास, पुनर्विनियोजन ( रिॲप्रोप्रिएशन ) सर्वसाधारण सभेने सम्मत केले आहे काय ?

(३) संस्थेच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या खर्चाची सर्वसाधारण अभिप्रायात नोंद करा.

(१०) व्यवस्थापन:—

वराह पैदास योजनेच्या विकासासाठी संस्थेने नकाशे आणि अंदाजपत्रके तयार केली आहेत काय ? ती पशुसंवर्धन खात्याने सम्मत केली आहेत काय ?

(११) कर्मचारी वर्ग:—

(१) पर्यवेक्षी कर्मचारी वर्गाच्या नेमणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी मिळविली आहे काय ?

(२) सेवा आणि रजा नियम तयार करून ते सक्षम प्राधिकाऱ्याने यथावत सम्मत केले आहेत काय ?

लेखा परीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम